# सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


क्रमांक:-विकाअ/शिक्षण/ईबीसी/२०१२/८८५

दिनांक :- ३१/३/२०१२

प्रति,

प्राचार्य,

सर्व विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी/पदवी/पदविका संस्था (अमरावती विभाग)

**विषय :- आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे ईबीसी अर्जामध्ये असलेल्या त्रुटया पुर्ण करण्याबाबत.**

संदर्भ :- या कार्यालयाचे आदेश क्रमांक :- विकाअ/शिक्षण/ईबीसी/२०१२/ २९५ दिनांक :- ६ फेब्रुवारी २०१२.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, या कार्यालयामार्फत संदर्भिय आदेशान्वये गठीत करण्यात आलेल्या तपासणी समितीमार्फत आपल्या संस्थेतील आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे ईबीसी अर्जाचे तपासणी करण्यात आलेली आहे. अर्जाची तपासणी करण्याकरीता दुरध्वनीव्दारे आपणास या कार्यालयात तपासणीसाठी उपस्थित राहण्याबाबत कळविलेले होते. तेव्हा आपल्या संस्थांनी सादर केलेल्या अर्जात काय त्रुटी आहेत हे आपणास अवगतच आहे. तसेच आपल्या संस्थेने सादर केलेल्या ईबीसी अर्जामध्ये असलेल्या त्रुटीची पुर्तता आठ दिवसात पुर्ण करण्याबाबत सुध्दा सबंधित कर्मचा-यास कळविलेले आहे. तथापी ब-याच संस्थांनी अजुनपर्यंत त्रुटींची पुर्तता केलेली नाही.

तेव्हा याबाबत आपणास कळविण्यात येते की, ज्या संस्थांनी त्रुटी पुर्ण केलेल्या आहेत व ज्या संस्थांनी अजुनपर्यंत त्रुटी पुर्ण केलेल्या नाहीत अश्या दोन्हीही संस्थांनी खाली दिलेल्या तक्त्यात नमुद केलेल्या दिनांकास या कार्यालयात स्वत: उपस्थित राहुन गठीत केलेल्या तपासणी अधिकारी/कर्मचा-यांचे समितीकडुन अर्जात असलेल्या त्रुटी आवश्यक ती कागदपत्रे खालील दिलेल्या दिनांकास उपस्थित राहुन सादर करुन पुर्ण करुन घ्याव्यात. अन्यथा आपल्या संस्थेतील ज्या विद्यार्थ्यांच्या अर्जात त्रुटी आहेत, अश्या विद्यार्थ्यांचे ईबीसी अर्ज सदर दिनांकास त्रुटी पुर्ण न झाल्यास नामंजुर केल्या जाईल याची नोदं घ्यावी. याबाबत भविष्यात होणा-या विद्यार्थ्यांचे नुकसानीस संस्थाप्रमुख म्हणुन सर्वस्वी जबाबदारी आपली राहील, याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | उपस्थित राहण्याचा दिनांक |
|---|---|---|
| १ | एमबीए/एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम | दिनांक ३/४/२०१२ |
| २ | अभियांत्रिकी /वास्तुशास्त्र पदवी | दिनांक ४/४/२०१२ |
| ३ | औषधनिर्माणशास्त्र पदवी | दिनांक ५/४/२०१२ |
| ४ | अभियांत्रिकी पदवीका | दिनांक ६/४/२०१२ |
| ५ | औषधनिर्माणशास्त्र पदवीका | दिनांक ७/४/२०१२ |

सहसंचालक तंत्रशिक्षण,

अमरावती.

प्रत :- १) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई (लक्षवेध :- श्री. अ.आ. पावसकर साहेब, सहा.संचालक, का.क्र. १५ ) यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता सादर.

२) प्रक्रियायोजक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी व एसएमएस करण्याकरीता.

E:\All Letters Manish.doc



Created with nitroPDF professional

download the free trial online at nitropdf.com/professional